उप. जि. व्य. शि. व प्र. अ. (अतां)
सहा. संचालक (व) (अतां)



गट अ (क) (अतां)

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जुलै १९९९.

अधिसूचना

340
भारताचे संविधान.

क्र. व्यशिअ. १०९५/(१८३६)/व्यशि-३.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्या बाबतीत करण्यात आलेले व राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात लागू करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम आदेश किंवा विलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल नियंत्रणाखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामधील महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट "अ" (कनिष्ठ) मधील उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (अतांत्रिक) सहाय्यक संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण (वरिष्ठ) (अतांत्रिक) या पदावरील सेवा प्रवेशाचे नियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना "उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (अतांत्रिक), व सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण (वरिष्ठ) (अतांत्रिक), महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ (क) (सेवाप्रवेश) नियम, १९९८" असे म्हणावे.

२. या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) "पदवी" म्हणजे एखाद्या सांविधिक विद्यापिठाची पदवी ;

(क) "संचालनालय" म्हणजे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

(ड) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. संचालनालयातील, उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (अतांत्रिक) या पदावरील नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करण्यात येईल :—

(अ) ज्या उमेदवारांनी महाराष्ट्र शिक्षण सेवा गट "ब" (अतांत्रिक) मधील प्रबंधक किंवा महा. संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण (अतांत्रिक) किंवा सहाय्यक शिकाऊ उमेदवारी सल्लागार (अतांत्रिक) किंवा सहाय्यक सचिव (अतांत्रिक) हे पद धारण केले आहे व त्या पदावर त्यांनी तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा केली आहे अशा उमेदवारांमधून जेष्ठता-नि-गुणवत्ता यांच्या तत्त्वावर योग्य व्यक्तींना पदोन्नती देऊन नियुक्ती करता येईल.

किंवा

(ब) ज्या उमेदवारांच्या बाबतीत पुढील शर्ती पूर्ण होत असतील अशा उमेदवारां-मधून नामनिर्देशनाने नियुक्ती करता येईल :—

(एक) उमेदवाराचे वय पस्तीस वर्षांपेक्षा जास्त नसावे. मात्र जो उमेदवार अगोदरपासूनच शासनाच्या सेवेत असेल त्याला ही शर्त लागू होणार नाही.

व

(दोन) तो निदान द्वितीय श्रेणीतील पदवीधारक असावा आणि

(तीन) त्याने, या नियमाच्या खंड (ब) च्या उपखंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता प्राप्त केल्यानंतर शासकीय कार्यालय किंवा शैक्षणिक संस्था यांमधील पर्यवेक्षकीय क्षमतेच्या सहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतका प्रशासकीय अनुभव धारण केलेला असावा:

परंतु, असाधारण अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण केलेल्या उमेदवारांच्या नावे आयोगाने शिफारस केल्यास शासनाकडून वयोमर्यादा शिथील करण्यात येईल :

आणखी असे की, उच्चतर अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करीत असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

४. संचालनालयातील, सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण (वरिष्ठ) (अतांत्रिक) या पदावरील नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करण्यात येईल :--

(अ) महाराष्ट्र शिक्षण सेवा गट (ब) (अतांत्रिक) मधील प्रवंधक सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण (अतांत्रिक), सहाय्यक, शिकाऊ उमेदवारी सल्लागार (अतांत्रिक) किंवा सहाय्यक सचिव (अतांत्रिक) हे पद धारण केलेल्या व या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून जेष्ठता-नि-गुणवत्ता या तत्वावर योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन नियुक्ती करता येईल किंवा

(ब) ज्या उमेदवारांच्या बाबतीत पुढील शर्ती पूर्ण होत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने नियुक्ती करता येईल :--

(एक) उमेदवाराचे वय पस्तीस वर्षांपेक्षा जास्त नसावे. मात्र अगोदरपासूनच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत ही शर्त लागू होणार नाही.

(दोन) उमेदवार निदान द्वितीय श्रेणीमधील पदवीधारक असावा आणि

(तीन) त्याने या नियमाच्या खंड (ब) च्या उपखंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता प्राप्त केल्यानंतर पर्यवेक्षकीय अधिकारात शासकीय कार्यालयातील किंवा शैक्षणिक संस्थेमधील सहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतका प्रशासकीय अनुभव मिळविलेला असावा :

परंतु असाधारण अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करीत असलेल्या उमेदवारांच्या नावाची आयोगाने शिफारस केल्यास, शासनाकडून वयोमर्यादा शिथील करण्यात येईल :

आणखी असे की, उच्च अर्हता किंवा अनुभव दोन्ही धारण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

५. नियम ३ व ४ या प्रत्येकाच्या खंड (ब) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचित जाती, बौद्ध धर्मात रुपांतरित झालेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती या उमेदवारांकरिता राखीव असलेली पदे भरण्यासाठी आवश्यक उच्चतर मुलभूत शैक्षणिक पात्रता व अनुभव असलेल्या उमेदवारांची संख्या पुरेशी नाही असे निवडीच्या कोणत्याही स्तरावर आयोगाचे मत झाल्यास आयोगास, अशा निवडीच्या बाबतीत, त्यात नमूद केलेली उच्चतर मूलभूत शैक्षणिक पात्रता किंवा अनुभवाचा कालावधी किंवा दोन्हींची आवश्यकता शिथील करता येईल व अशा जाती किंवा जमातींमधील योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

६. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करण्यात यावयाची नेमणूक ५० : ५० या गुणोत्तरात करण्यात येईल.

७. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर असेल.

८. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी मधील परीक्षा, जर ती व्यक्ती अगोदरच उत्तीर्ण झालेली नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यातून तिला सूट मिळालेली नसेल तर उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

९. या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र असेल.

१०. नियम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सेवेची निकड लक्षात घेऊन, तसे करणे आवश्यक असेल तर शासनास, आयोगाशी विचारविनिमय करून आवश्यक असेल तेथे नामनिर्देशनाने भरती करण्यासाठी या नियमात विनिर्दिष्ट केलेली टक्केवारी शिथील करून उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (अतांत्रिक), व सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण (वरिष्ठ) (अतांत्रिक) या पदावर नेमणूक करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा. रा. पाटील,
शासनाचे प्रधान सचिव.

---

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated 15th July 1999

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. VSA. 1095/(1836)/VE-3.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, and in force in the State or any part thereof, the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating the recruitment to the posts of Deputy District Vocational Education and Training Officer (Non Technical), and Assistant Director of Vocational Education and Training Senior) (Non Technical) in the Maharashtra Education Service, Group 'A' (Junior), in the Directorate of Vocational Education and Training under the Higher and Technical Education Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Deputy District Vocational Education and Training Officer (Non Technical), and Assistant Director of Vocational

Education and Training (Senior) (Non Technical), in the M.E.S. Gr. A (Junior) Directorate of Vocational Education and Training, under the Higher and Technical Education Department (Recruitment) Rules, 1998.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Commission " means the Maharashtra Public Service Commission;

(*b*) " degree " means degree of a statutory university;

(*c*) " Directorate " means the Directorate of Vocational Education and Training, Maharashtra State;

(*d*) " Government " means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Deputy District Vocational Education and Training Officer (Non Technical), in the Directorate shall be made either :—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority-*cum*-merit from amongst the persons holding the post of Registrar or Assistant Director of Vocational Education and Training (Non Technical) or Assistant Apprenticeship Advisor (Non Technical) or Assistant Secretary (Non Technical) in the Maharashtra Education Service, Group ' B ' (Non Technical) and having not less than three years regular service in that post; or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) unless already in the service of the Government are not more than thirty five years of age; and

(*ii*) possess a degree at least in second class; and

(*iii*) possess administrative experience in a supervisory capacity for not less than six years in the Government office or an Educational Institution gained after acquiring the qualification mentioned in sub-clause (*ii*) of clause (*b*) of this rule:

Provided that, the age limit may be relaxed by the Government on the recommendation of the Commission in favour of candidates possessing exceptional qualifications, or experience, or both:

Provided further that, preference may be given to candidates possessing higher qualification, or experience or both.

4. Appointment to the post of Assistant Director of Vocational Education and Training (Senior) (Non Technical), in the Directorate shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority-*cum*-merit from amongst the persons holding the post of Registrar, Assistant Director of Vocational Education and Training (Non Technical), Assistant Apprenticeship Advisor (Non Technical) or Assistant Secretary (Non Technical) in the Maharashtra Educational Service, Group " B " (Non Technical) and having not less than three years regular service in that post; or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) unless already in the service of the Government are not more than thirty-five years of age; and

क्र. अ(ब) (आ) ५८

उपसचिव (अता) (I.T.) (NT)



उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७

**15**

**भारताचे संविधान.**

क्रमांक व्हीएमए. १०९३/१३८०७/(१४४६)/व्यशि-३.---भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील उप सचिव (अतांत्रिक) महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत जसे :---

१. या नियमांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील उप सचिव (अतांत्रिक), गट-अ, महाराष्ट्र शिक्षण सेवा, सेवा प्रवेश नियम, १९९७ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर :---

(अ) संचालनालय म्हणजे महाराष्ट्र शासनाचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय.

३. संचालनालयाच्या अधिपत्याखलील, उपसचिव (अतांत्रिक), महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या पदावरील नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने करता यईल :---

(अ) संचालनालयाचे अधिपत्याखालील, प्रबंधक किंवा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण (अतांत्रिक) किंवा सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (अतांत्रिक) किंवा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब (अतांत्रिक) पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तिमधून सेवाज्येष्ठतेचे आधारे व योग्यतेचे अधिन राहून व तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा त्या पदावर पूर्ण केलेल्या व्यक्तीच्या पदोन्नतीने,

किंवा

(ब) संचालनालय किंवा संचालनालयाचे अधिपत्याखालील संस्थेमधील संवर्गावरील समकक्ष पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या बदलीने.

४. नेमणूक झालेल्या व्यक्तीस जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तीला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर हिंदी व मराठी भाषा परीक्षा, त्यासंबंधी केलेल्या नियमांनुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

५. पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रे. प्र. साहना,

शासनाचे प्रधान सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated the 15th November 1997.

CONSTITUTION OF INDIA.

No. VSA. 1093/13807/(1446)/VE-3.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Deputy Secretary (Non Technical) in the Maharashtra Educational Service, Group A in the Directorate of Vocational Education and Training under the Higher and Technical Education Department of Government of Maharashtra, namely;

1. These rules may be called the Deputy Secretary (Non-Technical), Group A ,Maharashtra Educational Services in the Directorate of Vocational Education and Training (Recruitment) Rules, 1997.

2. In these rules, unless the context requires otherwise, "Directorate" means the Directorate of Vocational Education and Training of Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Deputy Secretary (Non-Technical) in the Maharashtra Educational Service Group A, in the Directorate shall be made either.

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to, fitness amongst the persons holding the post of Registrar or Assistant Director of Vocational Education and Training (Non-Technical) or Assistant Apprenticeship Adviser (Non-Technical) or Assistant Secretary in the Maharashtra Educational Service, Group B (Non-Technical), having not less than three years of regular service in that post; or

(*b*) by transfer of a suitable person from amongst the persons holding the post in equivalent cadre in the Directorate or in the Institution under the Directorate.

4. A person appointed to the post shall be required to pass the examination in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing, these examinations.

5. A person appointed to the post shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. P. MAHANA,
Principal Secretary to Government.